विक्रीकर विभागातील लिपिक, लिपिक-टंकलेखक, टंकलेखक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना विक्रीकर निरीक्षक पदावर निवडीद्वारे नियुक्तीसाठी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०१५

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक :विकनि-१११४/प्र.क्र.१४४/विक्रीकर (प्रशा-२)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ नोव्हेंबर, २०१५.

विक्रीकर विभागातील लिपिक व लिपिक-टंकलेखक या संवर्गातील कर्मचा-यांना विक्रीकर निरीक्षक पदावर निवडीद्वारे नियुक्ती देण्यासाठी रविवार **दिनांक ३१ जानेवारी, २०१६** रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा -२०१५ फक्त मुंबई येथे घेण्यात येईल.

**२. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदांचा आरक्षणनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| **अ.क्र.** | **वर्गवारी** | **पदसंख्या** |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ११३ |
| २ | अनुसूचित जमाती | ८६ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३६ |
| ४ | भटक्या जमाती (ब) | २३ |
| ५ | भटक्या जमाती (क) | ४८ |
| ६ | भटक्या जमाती (ड) | २४ |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | १० |
| ८ | खुला | ३८३ |
| | **एकूण** | **७२३** |

**२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.**

२.२ वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज. (क), व भ.ज. (ड), वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदांसाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**३. पात्रता विषयक अटी :-**

३.१ फक्त महाराष्ट्र शासनाच्या विक्रीकर विभागातील लिपिक व लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील कर्मचारी प्रस्तुत परीक्षेस पात्र आहेत.

३.२ पात्र कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी सलग सात वर्षे विनाखंड नियमित सेवा पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे.

**३.३ नियमित सेवेचा कालावधी खालीलप्रमाणे गणण्यात येईल :-**

(१) आयोगामार्फत नामनिर्देशनाने नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून

(२) अनुकंपा तत्वावर नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून

(३) पदोन्नत कर्मचाऱ्याच्या नियमित पदोन्नतीच्या दिनांकापासून

(४) अन्य कारणास्तव सेवा नियमित झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या सेवा नियमित केल्या संबंधीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशाच्या दिनांकापासून

३.४ कोणत्याही परिस्थितीत लिपिक व लिपिक-टंकलेखक या संवर्गातील पदावरील अभावित नियुक्तीचा कालावधी पात्रतेसाठी गणण्यात येणार नाही.

३.५ लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी असलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झालेले अथवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेले नाही, असे कर्मचारी प्रस्तुत परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असणार नाहीत.

४. उमेदवारांनी अर्ज केल्याची माहिती आपल्या विभाग / कार्यालय प्रमुखांना कळविणे आवश्यक असून, याकरिता ऑनलाईन पध्दतीने आयोगाकडे पाठविलेल्या अर्जाची प्रत संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखांना सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांचा अर्ज विचारात घेण्यास विभाग / कार्यालय प्रमुखांना कोणताही आक्षेप असल्यास तसे विभाग / कार्यालय प्रमुखांने अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत आयोगास कळविणे आवश्यक आहे. मात्र अर्ज विचारात घेण्यास हरकत नसल्यास आयोगास तसे कळविण्याची आवश्यकता नाही; असेही संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखांना कळविण्यात यावे.

५. **परीक्षा केंद्र**

| परीक्षा केंद्र | केंद्र संकेतांक |
|---|---|
| मुंबई | ३० |

६. **शुल्क :-**

६.१ अमागास - ५२०/- ६.२ मागासवर्गीय - ३२०/-

**७. अर्ज करण्याची पद्धत :-**

७.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

७.२ पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ ते दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

७.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

७.४ ऑनलाईन पध्दतीने **आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे.** अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

७.५ आयोगास चुकीची माहिती सादर करणाऱ्या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

७.६ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

७.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर **"माझे ॲप्लिकेशन" सदरातील मर्यादित विभागीय परीक्षा या लिंकवर क्लिक करावे.**

(३) मर्यादित विभागीय परीक्षा या लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी "Pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल.

(४) "Pay Now" या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) चलनाद्वारे

**(क) नागरी सुविधा केंद्र**

(५) क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करता येईल.

(६) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(७) चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(८) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

७.८ विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही **दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

७.९ चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २६ नोव्हेंबर,** २०१५ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**७.१० मागासवर्गीयांना देय असलेल्या परीक्षा शुल्काची सवलत उमेदवाराने घेतली असल्यास अशा उमेदवाराची अमागास वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.**

८. अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे परिपत्रकातील विहित अर्हतेबाबतच्या अटींची पूर्तता करतात असे समजून पात्रता न तपासता आयोगाकडून उमेदवारांना तात्पुरता प्रवेश दिला जाईल. परंतु परीक्षेपूर्वी अथवा परीक्षेनंतर कोणत्याही टप्प्यावर, उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती चुकीची वा खोटी असल्याचे अथवा उमेदवार विहित अर्हतेची पूर्तता करीत नसल्याचे आयोगास आढळल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि त्याबाबतचा आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

९. प्रस्तुत परिपत्रकामध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in वेबसाईटवरील मर्यादित विभागीय परीक्षा अंतर्गत **"उमेदवारांना**

सर्वसाधारण सूचना " तसेच "मर्यादित विभागीय परीक्षा" या विभागातील "विक्रीकर निरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षा" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे.

१०. प्रवेशप्रमाणपत्र :-

१०.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१०.३ परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसेन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

११. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

१२. प्रस्तुत परिपत्रक आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१३. सदर परिपत्रकासोबतच्या विवरणपत्र-१ मध्ये परीक्षेची योजना व अभ्यासक्रमाचा समावेश केला आहे.

१४. सदर परिपत्रक रजेवर / प्रतिनियुक्तीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांसह सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

१५. प्रस्तुत भरतीकरीता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०१५" लागू आहे. तथापि, सद्य:स्थितीत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६/७/२०१५ च्या अधिसूचनेन्वये विक्रीकर विभागातील गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) अधिकाऱ्यांकरीता हे नियम राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंत स्थगित ठेवण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि. द. आठवले)
उप सचिव, वित्त विभाग

प्रति,

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, (पत्राने)
२. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. अपर विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई/पुणे/नागपूर.
४. सर्व विक्रीकर उपआयुक्त.
५. सहायक विक्रीकर आयुक्त (जनसंपर्क) महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. सहायक विक्रीकर आयुक्त (प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. निवड नस्ती, विक्रीकर (प्रशासन-३)

## विवरणपत्र-१
## विक्रीकर निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेची सुधारित परीक्षा योजना व अभ्यासक्रम

१. परीक्षा योजना :-

१.१ परीक्षेचे टप्पे - (एक) लेखी परीक्षा    १.२ एकूण प्रश्नपत्रिका- दोन.    १.३ एकूण २०० गुण

| प्रश्नपत्रिका क्रमांक व संकेतांक | विषय | दर्जा | कालावधी | प्रश्नसंख्या व गुण | माध्यम | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|
| पेपर - १ (०७५) | मराठी | शालांत | एक तास | २५ | मराठी | वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी |
| | इंग्रजी | शालांत | | २५ | इंग्रजी | |
| | विक्रीकर विभागासंबंधीचे सामान्य ज्ञान | विक्रीकर विभागामध्ये काम करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान. | | ५० | मराठी - इंग्रजी | |
| पेपर - २ (०७६) | विक्रीकर विभागाद्वारे अंमलबजावणी करण्यात येणारे कायदे व नियम, विक्रीकर विभागाची कार्यपद्धती व लेखाशास्त्र. | विक्रीकर विभागामध्ये काम करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान. | एक तास | १०० | मराठी - इंग्रजी | |

२. अभ्यासक्रम :-

### २.१ पेपर क्रमांक - १

| अ.क्र | घटक व उपघटक | एकुण गुण |
|---|---|---|
| १. | **मराठी** -सर्वसामान्य शब्द संग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग, तसेच उता-यांवरील प्रश्नांची उत्तरे. | २५ |
| २. | **इंग्रजी** - Common vocabulary, Sentence structure, Grammar, Use of idioms and phrases & and their meaning and Comprehension of passage | २५ |
| ३. | विक्रीकर विभागासंबंधीचे सामान्य ज्ञान- | ५० |

| | | |
|---|---|---|
| (अ) | **भारतीय संविधानातील व्यापार तसेच वित्त विषयक तरतुदी** | १५ |
| | (१) घटनेनुसार व्यापार स्वातंत्र्य (अनुच्छेद ३०१ ते ३०४) | |
| | (२) राज्य शासन, केंद्र शासन यांचे आर्थिक संबंध (अनुच्छेद २६८ ते २७०) | |
| | (३) करविषयक तरतूदी, प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर (अनुच्छेद २४५, २४६, २४८, २५४, ३६६.) | |
| | (४) वित्त आयोगाची स्थापना व त्याचे कार्यक्षेत्र (अनुच्छेद २६४, २८०, २८१.) | |
| | (५) वित्त विधेयकाची मांडणी व मंजूरीचे, तसेच लोकलेखा समिती यांचे सामान्य ज्ञान (अनुच्छेद ११०, ११७.) | |
| (ब) | **विविध व्यावसायिक संस्था व त्यांचे करासंबंधीचे दायित्व** | १० |
| | खालील ६ संस्थांची निर्मिती, कार्यपध्दती, हक्क व कर्तव्ये, दायित्व बंद करण्याची प्रक्रिया यासंबंधीची सर्व सामान्य माहिती व ज्ञान | |
| | (१) मालकी संस्था (Proprietorship) | |
| | (२) भागिदारी संस्था (Partnership firm) | |
| | (३) खाजगी मर्यादित कंपनी | |
| | (४) सार्वजनिक मर्यादित कंपनी | |
| | (५) सहकारी संस्था | |
| | (६) क्लब्स/ व्यक्तींचा समूह | |
| (क) | **विक्रीकर विभागाची रचना** | २५ |
| | (१) विक्रीकर विभागातील विविध शाखा, त्यांचा परस्परांशी असलेला संबंध, नियंत्रण, अधिकार - श्रेणी. | |
| | (२) विक्रीकर आयुक्तांपासून ते विक्रीकर निरीक्षकांपर्यंतच्या सर्व अधिका-यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, विशेष अधिकार, शक्ती प्रदान करण्याच्या पध्दती (Delegation of powers) | |
| | (३) प्रत्येक शाखेचे अधिकार व कार्ये | |

**पेपर क्रमांक - २**

| अ.क्र | घटक व उपघटक | एकुण गुण |
|---|---|---|
| 1 | **SECTION - A** | ७० |
| | ***Acts/Rules administered by Sales Tax Department*** | |
| **(01)** | The Maharashtra Value Added Tax Act,2002 and<br>The Maharashtra Value Added Tax Rules,2005 | ५० |
| | (a) Definition - **Section** - 2 & Rule - 2 | |
| | (b) (i) Incidence and levy of tax - **Section** - 3 to 8 | |
| | (ii) Amendment of Schedule - Section - 9 | |
| | (c) Registration :- **Section** -16 to18 & **Rules** - 8 to 11 | |
| | (d) Returns, Assessment, etc. : **Section** - 20 to 26 & **Rules** - 17 to 26 | |
| | (e) Penalty and Interest : **Section** - 29 & 30 | |
| | (f) Payment of Tax and Recovery: **Section** - 32 to 35, 37 & 38. | |

| | | |
|---|---|---|
| | (g) Offences and Penalties : **Section** - 74 | |
| | (h) Other Sections : **Section** - 64 & 86 & **Rules** - 77 | |
| | (i) Set off : **Section** - 48 & **Rules** - 52 to 55<br>(i) Tax Schedule and Composition Schemes under Section 42. | |
| **(02)** | ***The Central Sales Tax Act and Rules, 1956:*** | १० |
| | (a)Definitions: **Section** - 2 to 5 | |
| | (b) Incidence and levy of Tax : **Section** - 6,6-A, 7 to 10 & 14<br>& Central Sales Tax **Rules** - 3,4,12. | |
| **(03)** | ***The Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975:***<br>**Section** :- 2 to 10, 27-A & Schedule (Rate of Tax).<br>**Rules** - 3,4,10,11 | ५ |
| **(04)** | ***The Maharashtra Tax on Luxuries Act, 1987:***<br>**Section** :- 2,3,3-A, 3-B, 3-D, 3-E, 5 | २ |
| **(05)** | ***Maharashtra Tax on the Entry of Goods into Local Areas Act,2002 &***<br>***Maharashtra Tax on the Entry of Motor Vehicles Into local Areas Act,1987***<br>***The Maharashtra Purchase Tax on Sugarcane Act,1962.*** | ३ |
| **2** | **SECTION -B** | २० |
| | ***Manual of Office Procedure (Under VAT) For Sales Tax Department:*** | २० |
| | (01) Chapters - Registration, Returns, Assessment, Appeal, Investigation, Recovery | |
| | (02) Chapters - Business Audit, Refund & Refund Audit, Large Taxpayer Unit and Legal Branch. | |
| **3** | **SECTION - C** | १० |
| | *ACCOUNTANCY* : Double Entry Book-Keeping | |
| | (01) Definition, Meaning & uses of book-keeping | |
| | (02) Principles, concepts & conventions of Accounting. | |
| | (03) Journals, Ledgers, Various Subsidiary Books and their utility, Types of Accounts, Basic Rules of Accounting | |
| | (04) Basic accounting Terminology | |
| | (05) Introduction, meaning & Purposes of Trial Balance, Trading Account, Profit & Loss Account and Balance Sheet. | |